सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/ 3951 दिनांक : - 3 OCT 2024

**परिपत्रक**

**प्रति,**
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
वर्कींग प्रोफेशनल पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून वर्कींग प्रोफेशनल करिता सुरू करण्यात आलेल्या स्वतंत्र तुकडीत प्रवेशीत वर्कींग प्रोफेशनल्सकरीता शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय नसल्याबाबत.**

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/२०२४/७०५ दि.०६.०९.२०२४
२. शासनाचे पत्र क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.२६०/तांशि-४, दि.३०.०८.२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संचालनालयाचे संदर्भ क्र.०१ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रासोबत शासनाचे पत्र असून सदर पत्रान्वये वर्कींग प्रोफेशनल पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना कळविण्यात येते की, शै.व.२०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी पदवी व पदविका अभ्यासक्रमांकरीता वर्कींग प्रोफेशनल करीता अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी दिली आहे. परंतु सदरील अभ्यासक्रम व्यवसाय करणाऱ्या कार्यरत व्यावसायिकांसाठी (Working Professionals) असल्याने त्यांना शिष्यवृत्ती योजना तसेच, शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना लागू करणे योग्य नाही, असे शासनाने संदर्भ पत्र क्र.०२ अन्वये कळविले आहे.

तरी उपरोक्त बाबत सर्व वर्कींग प्रोफेशनल पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी याची नोंद घ्यावी.

सोबत- संदर्भिय पत्रे

**( डॉ. द. व्यं. जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४९२, ४६५, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/२०२४/ ७०५

दिनांक : - 6 SEP 2024

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर,
नाशिक, पुणे व मुंबई.

विषय: अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरुन वर्कींग प्रोफेशनल करीता सुरू करण्यात आलेल्या स्वतंत्र तुकडीत प्रवेशीत वर्कींग प्रोफेशनल्सकरीता शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय नसल्याबाबत...

संदर्भ: शासन पत्र क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.२६०/तांशि-४, दि. ३० ऑगस्ट, २०२४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शै.वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी पदवी व पदविका अभ्यासक्रमांकरीता वर्किंग प्रोफेशनल करीता अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिली आहे. हे अभ्यासक्रम व्यवसाय करणा-या कार्यरत व्यावसायिकांसाठी (Working Professionals) असल्याने त्यांना शिष्यवृत्ती योजना तसेच, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करणे योग्य नाही असे शासनाने संदर्भाधीन पत्रान्वयें कळविले आहे.

सदर बाब आपल्या अधिपत्याखालील वर्कींग प्रोफेशनल पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
24 SEP 2024
आवक क्र. 7846

E:\Vaidya\D data\sandhya\2024\General Letter 24-25\Letter to all RO and FRA.docx

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२०४०९३५
Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्रमांक: मान्यता-२०२४/प्र.क्र.२६०/तांशि-४ दिनांक : ३० ऑगस्ट, २०२४.

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय - अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरुन विद्यमान अनुदानित अभ्यासक्रमाच्या संस्थेत विनाअनुदानित तत्वावर पदवी व पदविका वर्कींग प्रोफेशलनल करिता अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिलेल्या संस्थांची शुल्क निश्चिती करणेबाबत...

संदर्भ :-आपले पत्र क्र.२/एनजीसी/वर्कींग प्रो.शुल्क/२०२४/५९७, दि.१४.०८.२०२४

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने पदवी व पदविका वर्कींग प्रोफेशलनल करिता पदवी व पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचे शुल्क निश्चित करण्याबाबत दि.३०.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण यांना कळविण्यात आले आहे.

तसेच, Lateral Entry to the Courses for Working Professionals ही योजना नोकरी / व्यवसाय करणाऱ्या कार्यरत व्यावसायिकांसाठी (Working Professionals) असल्याने त्यांना शिष्यवृत्ती योजना तसेच, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करणे योग्य नाही, असे मत आपण व्यक्त केले आहे. त्यास सहमती दर्शविण्यात येत आहे.

(शहाजहान मुलाणी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती - तांशि-४.